9:47 60%

**MEHUNBARE POLICE STATION**
मेहुणबारे पोलीस स्टेशन ता.चाळीसगाव जि.जळगाव LANDLINENO.-
०२५८९-२८६०२३
E-MAILID-Mehunbaraps@gmail.com

**प्रेस नोट**

दि. 12/12/2025

प्रति,
सर्व संपादक,
दैनिक वृत्तपत्र, साप्ताहीक, मासिक

**विषय - मेहुणबारे पोलीस स्टेशनकडून महीलेचा विनयभंग करणारा, 09 वर्षापासून फरार असलेल्या आरोपीला अटक केलेबाबत..**

जिल्हा पोलीस अधिक्षक मा. डॉ. श्री महेश्वर रेडडी सो, अपर पोलीस अधिक्षक, चाळीसगांव मा. श्रीमती कविता नेरकर सो, व उपविभागीय पोलीस अधिकारी, चाळीसगांव उप विभाग मा. श्री विजयकुमार ठाकुरवाड सो, यांनी पोलीस स्टेशन रेकॉर्डवरील पाहीजे / फरार आरोपी यांना अटक करुन योग्य ती कार्यवाही करणेबाबत मार्गदर्शनपर सुचना दिल्या होत्या.

मेहुणबारे पोलीस स्टेशन येथे दिनांक 25/11/2016 रोजी गुरक्र. 97/2016 भादवि कलम 354 (अ) प्रमाणे दाखल करण्यात आला होता. नमुद गुन्हयातील महीलेचा विनयभंग करणारा आरोपी नामे युवराज नामदेव पवार रा. शिरसगांव ता. चाळीसगांव हा गुन्हा केलेपासून 09 वर्षे फरार होता. सदरचा गुन्हा हा महीलांचे बाबतचा गंभीर स्वरुपाचा असल्याने आरोपीस अटक करणे आवश्यक होते. नमुद आरोपीचा शोध घेत असताना सदरचा आरोपी हा मुंबई येथे असलेबाबत गोपनिय माहीती प्राप्त झाली होती. आरोपीचा शोध घेणेकामी प्रभारी अधिकारी प्रविण दातरे सहायक पोलीस निरीक्षक यांनी पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे एक पथक नेमले होते. पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी नमुद आरोपीचा तांत्रिक पध्दतीने तपास करुन त्यास अंधेरी मुंबई येथून शिताफीने ताब्यात घेवून पोलीस स्टेशन येथे घेवून आले. त्यानंतर आरोपीस नमुद गुन्हयामध्ये अटक करुन त्याची न्यायालयीन कस्टडी मध्ये रवानगी करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी मा. वरिष्ठांच्या सुचना व मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी श्री प्रविण दातरे, सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस उप-निरीक्षक श्री सुहास आव्हाड, पोलीस उप-निरीक्षक श्री विकास शिरोळे, पोहेकॉ शांताराम पवार, पोकॉ विनोद बेलदार, पोकॉ संजय लाटे यांनी केली आहे.

SD/-
**प्रविण अ. दातरे**
**सहा. पोलीस निरीक्षक**
**मेहूणबारे पोलीस स्टेशन**

Scanned with OKEN Scanner


ISO9001:2008 मानांकीत
फोन नं.-०२५८९-२८६०२३
मेहुणबारे पोलीस स्टेशन